महाराष्ट्र शासन

कार्यालय- सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अमरावती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सामाजिक न्याय भवन, चांदूर रेल्वे रोड, अमरावती

फोन/फॅक्स-०७२१-२६६१२६१. Email Id-speldswo_amt@rediffmail.com

दि. /०२/२०२२

जाक्र.सहा.आ.सक/अम /२०२१-२२/

## ***प्रसिद्धी पत्रक***

### *राज्यात विद्यार्थ्यांना आता "समान संधी केंद्र" च्या वतीने मार्गदर्शन मिळणार*.

### *विकास व गुणवत्ता वाढीसाठी समाज कल्याण विभागाचा प्रयत्न*

राज्यातील विविध महाविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती, फ्रीशिप व इतर शासनाच्या योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता व्यवसाय व रोजगार निर्मितीसाठी आर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन करणे. तसेच संवाद अभियान- युवा संवाद यासारखे कार्यक्रम सुरु करण्याकरिता आता महाविद्यालयामध्येच विद्यार्थ्यांसाठी "समान संधी केंद्रे" -( Equal Opportunity Centre) स्थापन करण्याचे समाज कल्याण विभागाने ठरविले आहे, त्यासंदर्भात मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मा. श्री धनंजय मुंडे यांनी नुकतेच निर्देशीत केले आहे. राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात त्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व सहाय्यक म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेऊन महाविद्यालयातच "समान संधी केंद्रे" सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सुधारित विकासासह त्याचे सर्व मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास व व्यवसाय रोजगार निर्मितीच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाने या केंद्राच्या माध्यमातून उपायोजना करण्याचे ठरवले आहे. सदर "समान संधी केंद्राच्या' माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, रोजगार प्राप्तीसाठी किंवा उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींचा सर्वसमावेशक मार्गदर्शन याद्वारे करण्यात येणार आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय तसेच इतर सर्व शैक्षणिक संस्था सर्व महाविद्यालयांमध्ये या स्वरूपाची केंद्रे तात्काळ चालू शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी प्रत्यक्ष महाविद्यालय चालू नसले तरी प्रत्येक महाविद्यालयाने सदर "समान संधी केंद्राची" स्थापना करून महाविद्यालय निहाय समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करून त्यासाठी व्हाट्सअप ग्रुप तयार करावा किंवा इतर समाज प्रसार माध्यमांचा वापर करून संबंधित महाविद्यालयातील प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांशी समन्वय करणे बाबत सुचित करण्यात यावे.

त्या अनुषगाने जिल्ह्यातील महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनसाठी "समान संधी केंद्रे" -( Equal Opportunity Centre) स्थापन करण्याचे आव्हान जिल्हातिल सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य यांना श्रीमती. माया केदार, सहायक आयुक्त समाज कल्याण अमरावती. यांचे मार्फत करण्यात येत आहे.

**"समान संधी केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक योजनांचे मार्गदर्शन मिळण्यासाठी व त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व्यासपीठ निर्माण होणार आहे, व याद्वारे विद्यार्थी व शासन यामध्ये संवाद साधण्यास मदत होणार आहे " -डॉ.प्रशांत नारनवरे, समाज कल्याण आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य , पुणे.**

(माया केदार)

सहाय्यक आयुक्त,

समाज कल्याण, अमरावती.